विटे येथील मे.सिव्हिल जज्जसाो सिनियर डिव्हिजन यांचे कोर्टात

रे.दि.मु.नं.२२८ / २०२५

भगवान बंडू धनवडे ... वादी

विरूध्द

मा.जिल्हाधिकारी,सांगली, वगैरे ... प्रतिवादी

यात वादीतर्फे सी.पी.सी. ८०(२) प्रमाणे नोटीसचा कालावधी व्हेव करून दावा दाखल करणेसाठी परवानगी मिळणेकरीता अर्ज की,

१) सदर कामातील वादी यांनी प्रतिवादी नं. १ ते ८ यांनी दांडगाव्याने वादीचे दावा मिळकतीमधून हद्द कायम केलेखेरीज रस्ता करू नये याकरीता हद्द निश्चितीचा व निरंतर ताकिदीचा दावा दाखल केला आहे.

२) महा.शासनाविरूध्द दावा दाखल करताना नियमानुसारनोटीस देणे बंधनकारक असते. परंतु या कामातील प्रतिवादी नं. १ ते ८ यांनी वादीचे दावा मिळकतीमधून हद्द कायम न करता दांडगाव्याने रस्ता केलेस वादी यांचे नुकसान होणार आहे. वादी यांना प्रतिवादी यांनी रस्ता करणेबाबत नोटीस दिली आहे.

३) सदरील प्रतिवादी यांनी दिलेल्या नोटीसीप्रमाणे वादीचे दावा मिळकतीमधून पिकाचे नुकसान करून दांडगाव्याने रस्ता करणेची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वादी यांचे कधीही पैशात न भरून येणारे नुकसान होणार आहे.

४) अशा प्रकारची प्रतिवादी नं. १ ते ८ यांनी चुकीची व बेकायदेशीर कारवाई करून दावा मिळकतीमधून रस्ता केलेस मग

मात्र वादीस निष्कारण खर्चाचे व त्रासाचे होणार आहे. तसेच अशा प्रतिवादी नं.१ ते ८ यांच्या चुकीच्या कृत्यामुळे वादीचे कायमस्वरूपी नुकसान होणार आहे. वादीस मिळकतीचा उपभोग घेणे त्रासाचे होणार आहे.

५) तरी वादीस प्रतिवादीविरूध्द तातडीने हुकुम घेणेसाठी प्रतिवादी नं. १ ते ८ यांना नोटीस सी.पी.सी. ८०(२) अन्वये नोटीस दिलेली आहे. परंतु तातडीने हुकुम होणे आवश्यक असलेने अशी कायद्याने दिलेली नोटीसीची मुदत व्हेव करणेत येवून मुदतीपूर्वी दावा दाखल करणेस परवानगी देणेत येवून दावा दाखल करून घेणेत यावा अशी विनंती आहे.

सोबत— वादीचे ॲफिडेव्हिट दिलेले आहे.

येणेप्रमाणे अर्ज असे.

कडेगांव

दि. २४/९/२०२५

वादींतर्फे ॲडव्होकेट

25/09/2025

Read the application, heard the counsel. Considering the urgency the application is allowed.